पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड
पत्ता : दुसरा मजला एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे,पी.सी.एन.टी.डी.ए. सर्कल,
सेक्टरनं.०७,स्पाईन रोड, भोसरी पुणे, ४११०२६
ईमेल- dcpzone3.pcpc-mh@gov.in

प्रेसनोट ता. ०२/१०/२०२४

**चाकण पोलीस स्टेशन कडील डी. बी. पथकाकडुन चार घरफोडी चोरीच्या गुन्हयाची उकल, दोन आरोपी अटक, २ लाख रुपयांचा मुददेमाल जप्त**

---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत घर फोडी चोरीचे वाढते प्रमाणे लक्षात घेता श्री. विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी सर्व पोलीस ठाणेस घर फोडी चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्याकरीता घर फोडी चोरीचे उघडकीस आणण्यासाठी आदेशीत केले होते.

आम्ही चाकण पोलीस ठाणे कडील तपास पथकास आदेशीत केले वरुन चाकण पोलीस ठाणे गुरनं ५०२/२०२४ बी एन एस कायदा कलम ३३१(४), ३०५(अे),६२, ३(५) प्रमाणे दाखल गुन्हयाचा तपास प्रमोद वाघ वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नाथा घार्गे पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे सपोनि प्रसंन्न जराड, गणपत धायगुडे व तपास पथकातील पोलीस अंमलदार असे मिळुन तपास करीत असतांना दिनांक २४/०९/२०२४ रोजी चाकण पोलीस स्टेशन कडील डी बी पथकास गोपनीय बातमीदार यांचेकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे इसम नामे १) विकास रमेश मोहिते, वय २२ वर्षे, रा. शेलपिंपळगाव, दावडी रोड, ता. खेड जि. पुणे यास शेलपिंपळगाव येथुन तर त्याचा सहकारी २) महेश संजय दौंडकर, वय २१ वर्षे, रा. शेलपिंपळगाव, ता. खेड जि. पुणे यास दौड येथुन ताब्यात घेवुन वरील दोन्ही आरोपींकडे घर फोडी चोरीच्या गुन्हया बाबत चौकशी केली असता प्रथम वरील आरोपींनी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास केला असता त्यांनी शेलपिंपळगाव परिसरात वेगवेगळया ठिकाणी घरफोडी चोरीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली. वरील आरोपींताकडुन खालील प्रमाणे घर फोडी चोरीचे ०४ गुन्हे उघड झालेले असुन आरोपींकडुन गुन्हयातील सोन्या चांदीचा मुददेमाल तसेच रोख रक्कम, मोबाईल फोन असे मिळुन एकुण २,००,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

| अ नं | पोलीस स्टेशन | गुरनं व कलम |
|---|---|---|
| १ | चाकण पोलीस ठाणे | ५०२/२४ बी एन एस कलम ३३१(४), ३०५(अे),६२, ३(५) प्रमाणे |
| २ | चाकण पोलीस ठाणे | ४५/२०२४ भादवि कलम ४५४, ४५७, ३८० |
| ३ | चाकण पोलीस ठाणे | ६७३/२४ बी एन एस कलम ३३१(४), ३३१(३), ३०५(अे), प्रमाणे |
| ४ | चाकण पोलीस ठाणे | ६७४/२४ बी एन एस कलम ३३१(४), ३०५(अे), प्रमाणे |

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री. शशिकात महावरकर, अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ डॉ. शिवाजी पवार, सहा.पोलीस आयुक्त, राजेंद्रसिंह गौर यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद वाघ, पोनि गुन्हे श्री. नाथा घार्गे, डी बी पथकाचे सपोनि प्रसंन्न जराड, गणपत धायगुडे, पोलीस अंमलदार हनुमंत कांबळे, भैरोबा यादव, सुनिल शिंदे, शिवाजी चव्हाण, इंद्रकुमार धोत्रे, गणेश वाडेकर, राजु जाधव, सुदर्शन बर्डे,नवनाथ खेडकर, किरण घोडके, सुनिल भागवत, महेश कोळी, महादेव बिक्कड, रेवनाथ खेडकर, शरद खैरणार, नितीन गुंजाळ, माधुरी कचाटे यांनी केलेली आहे.सदर गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.

**(डॉ.शिवाजी पवार)**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड**